**ठळक बातम्या**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नवी दिल्ली इथं रायसीना संवाद २०२५चं उद्घाटन करणार, न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झन यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती

विकसित भारत, विकसित महाराष्ट्र हा आपल्या अर्थसंकल्पाचा मूळ गाभा असल्याचं महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांचं विधानसभेत प्रतिपादन

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात अडकलेले सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर उद्या रात्री पृथ्वीवर परततील, अशी नासाची माहिती

**आणि**

माजी केंद्रीय मंत्री देबेंद्र प्रधान यांचं निधन

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज संध्याकाळी सहा वाजता नवी दिल्ली इथं रायसीना संवाद २०२५चं उद्घाटन करणार आहेत. या संवादाचं हे दहावं वर्ष आहे. न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झन हे या संवादाच्या उद्घाटनाच्या सत्राला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील आणि उपस्थितांशी संवाद साधतील. दरम्यान, या दोन्ही प्रधानमंत्र्यांमध्ये आज नवी दिल्लीत चर्चा झाली. या चर्चेत भारत आणि न्यूझीलंड संबंधांच्या

विविध पैलुंचा समावेश होता. तत्पूर्वी लक्झन यांनी आज सकाळी राजघाट इथे महात्मा गांधींच्या समाधीचं दर्शन घेऊन त्यांना आदरांजली वाहिली. यंदा रायसीना संवादाची मध्यवर्ती संकल्पना 'कालचक्र - नागरिक, शांतता आणि पृथ्वी' अशी आहे. येत्या १९ तारखेपर्यंत चालणाऱ्या या कार्यक्रमात १२५ देशांमधून विविध क्षेत्रांमधले आघाडीचे नागरिक सहभागी होणार आहेत. यासाठी विविध देशांचे प्रतिनिधी नवी दिल्लीला पोहोचत आहेत. लक्झन यांच्या पाच दिवसांच्या दौऱ्यादरम्यान बुधवारी ते मुंबईलाही भेट देणार आहेत.

<><><><><>

अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज प्रधानमंत्री इंटर्नशिप अर्थात आंतर्वासिता योजनेसाठी (पीएमआयएस) एक समर्पित ॲपचं उद्घाटन करणार आहेत. इंटर्नशीप योजनेच्या दुसऱ्या फेरीसाठी नोंदणी सुलभ करून विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे, येत्या २१ मार्चपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

<><><><><>

कंपनी कायदा आणि दिवाळखोरी संहिते अंतर्गत आतापर्यंत २० हजारांहून अधिक प्रकरणं न्यायालयांमध्ये प्रलंबित असल्याचं सरकारनं लोकसभेत सांगितलं. कॉर्पोरेट व्यवहार राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा यांनी आज लोकसभेत उपस्थित केलेल्या पूरक प्रश्नाला उत्तर देताना ही माहिती दिली. प्रलंबित प्रकरणांचा तातडीनं निपटारा करण्यासाठी ठोस पावलं उचलण्यात आल्याचं मल्होत्रा यांनी सांगितलं. यात ई-कोर्ट, हायब्रिड कोर्ट योजना, सदस्यांची

क्षमता वाढवणं आणि रिक्त पदे भरणं या उपायांचा यात समावेश असल्याचंही मल्होत्रा यांनी सांगितलं.

<><><><><>

विकसित भारत, विकसित महाराष्ट्र हा आपण सादर सादर केलेल्या अर्थसंकल्पाचा मूळ गाभा आहे, असं प्रतिपादन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आज केलं. ते आज विधानसभेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर देत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत आपला देश विकसित राष्ट्रं करण्याचं ध्येय निश्चित केलं आहे. महाराष्ट्राची राजधानी मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून महाराष्ट्रानेही देशाच्या प्रगतीत पूर्वीपासून सिंहाचा वाटा उचचला आहे. त्यामुळे प्रधानमंत्र्यांनी ठरवलेलं विकसित भारताचं ध्येय गाठण्यासाठी महाराष्ट्र कुठेही कमी पडणार नाही, असंही पवार यावेळी म्हणाले.

महाराष्ट्र देशाच्या प्रगतीत सर्वात जास्त योगदान देणार आहे हे अर्थसंकल्पात दिसून येत आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात शेती, उद्योग, पायाभूत सुविधा, रोजगार, कल्याणकारी योजना या पाच प्रमुख घटकांवर लक्ष केंद्रित करण्यात आल्याचंही पवार यावेळी म्हणाले. सध्या विधानसभेत अर्थसंकल्पावर चर्चा सुरू आहे.

<><><><><>

भारतीय कापूस महामंडळामार्फत सुरू असलेली कापूस खरेदी पारदर्शकपणे व्हावी यासाठी राज्यशासन प्रयत्नशील असून आत्तापर्यंत राज्यात १२४ केंद्रांमार्फत १४२ कोटी ६९ लाख क्विंटल इतकी कापूस खरेदी करण्यात आली आहे, अशी माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी या संदर्भातल्या

प्रश्नाच्या उत्तरात दिली. या संदर्भातील प्रश्न अमित झनक यांनी उपस्थित केला होता. कापसाच्या खरेदीसाठी भावांतर योजना लागू करावी असा आग्रह विरोधी पक्षाच्या सदस्यांनी धरला होता. खुल्या बाजारातले व्यापारी देखील या केंद्रामधून कापूस खरेदी करत आहेत त्यामुळे भावांतराचा विषय उद्भवत नाही. सीसीआयने लांब धाग्याच्या कापसाला ७ हजार ५२१ रुपये हा हमीभाव दिला आहे अशी माहिती देखील रावल यांनी यावेळी दिली.
सध्या अस्तित्वात असलेली ३२५ गोदामं कमी पडत असल्याने आणखीन गोदामे मिळवण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे, अशी माहिती देखील त्यांनी यावेळी दिली. १५ मार्चपर्यंत नोंदणी झालेल्या सगळ्यांची कापूस खरेदी करण्यात येईल आणि ही मुदत वाढवण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रयत्न करण्यात येतील असं आश्वासन रावल यांनी यावेळी दिली.

<><><><>

मुंबईत होत असलेल्या वेव्हज अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिटच्या निमित्तानं ईस्पोर्ट्स स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. ईस्पोर्ट्स फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या या ऑनलाईन स्पर्धेत ई-फुटबॉल, WCC आणि BGMI या खेळांचे सामने राष्ट्रीय स्तरावर विविध टप्प्यात होणार आहेत. अधिक माहितीकरता वेव्हज इंडिया डॉट ओआरजी या संकेतस्थळाला भेट देऊ शकता.
वेव्हज ही जागतिक दृकश्राव्य मनोरंजन शिखर परिषद मुंबईत १ ते ४ मे या कालावधीत होणार आहे.

<><><><>

महाराष्ट्र विधान परिषदेच्या पोटनिवडणुकीसाठी अर्ज भरायचा आज शेवटचा दिवस आहे. भाजपाने संजय किणीकर, दादाराव केचे आणि संदीप जोशी यांना काल उमेदवारी जाहीर केली. शिवसेनेकडून चंद्रकांत रघुवंशी हे आज अर्ज भरणार आहेत. राष्ट्रवादी कांग्रेसकडून संजय खोडके यांनी विधानपरिषदेच्या पोटनिवडणुकीसाठी अर्ज भरला आहे.

ही निवडणूक २७ मार्च रोजी होणार आहे आणि त्याचदिवशी संध्याकाळी ५ वाजता मतमोजणी होईल. आमश्या पाडवी, प्रवीण दटके, राजेश विटेकर, रमेश कराड आणि गोपीचंद पडळकर हे विधानसभेत निवडून आल्यानं रिक्त झालेल्या जागांसाठी ही निवडणूक होत आहे.

**<><><><><>**

ठाणे जिल्ह्यात बदलापूर नगरपरिषदेच्या माजी नगरसेवकाला ब्लॅकमेल करत त्याच्याकडून जबरदस्तीनं पैसे वसूल करणाऱ्या चौघांना अटक केल्याची माहिती पोलिसांनी आज दिली. एका महिलेसोबतचा आक्षेपार्ह फोटो माजी नगरसेवकाला या चौघांनी पाठवला होता. हा फोटो समाज माध्यमावर टाकण्याची बदनामीची धमकी देत नगरसेवकाकडे ५० लाख रुपयांची मागणी केली. याप्रकरणी माजी नगरसेवकानं पोलिसांकडे तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी तपास करत शनिवारी बदलापूरमधून ३२ वर्षांच्या एका व्यक्तीला अटक केली. त्याची चौकशी केली असता त्याच्या अन्य तीन सहकाऱ्यांची नावं समोर आली आणि त्यांनाही अटक करण्यात आली.

**<><><><><>**

न्यू इंडिया को ऑपरेटिव्ह बँक घोटाळ्यात आणखी एका आरोपीला मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली. त्याचं नाव अरुणाचलम मरुथुवर असून त्याच्या अटकेसाठी पोलिसांनी विविध शहरांमध्ये पथकं पाठवली होती, परंतु तो स्वतःच पोलिसांना शरण आला असून न्यायालयाने त्याला चौकशीसाठी उद्यापर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. याशिवाय पोलीस अजून दोन आरोपींच्या शोधात आहेत.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात नऊ महिन्यांहून अधिक काळ अडकलेले सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर हे दोन्ही अंतराळवीर उद्या रात्री पृथ्वीवर परततील अशी माहिती अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासाने एका निवेदनाद्वारे दिली आहे. सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर, यांना आणखी एक अमेरिकन अंतराळवीर आणि एका रशियन अंतराळवीरासह स्पेसएक्स क्रू ड्रॅगन यानाद्वारे पृथ्वीवर आणण्यात येईल.

नासाचे अंतराळवीर निक हेग आणि रोस कॉसमॉस अंतराळवीर अलेक्झांडर गोर्बुनोव्ह देखील ड्रॅगन कॅप्सूलवर परततील. आठ दिवसाच्या अभियानासाठी गेलेल्या सुनिता विल्यम्स आणि बुच विल्मोर गेल्या ९ महिन्यांपासून अंतराळात अडकून पडले आहेत.

**<><><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प उद्या रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांच्याशी दूरध्वनीवरुन  संभाषण करणार असून त्यात युक्रेन युध्दविरामासह जमीन मालकी आणि विद्युत कारखान्यांबद्दल चर्चा होणार

असल्याचं त्यांनी सांगितलं. ट्रम्प यांच्या फ्लोरिडा ते वाॅशिंग्टन या विमान प्रवासादरम्यान वार्ताहरांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली. ट्रम्प यांनी जानेवारीत पदभार स्वीकारल्यानंतर पुतीन यांच्याबरोबरच हे त्यांचं दुसरं दूरध्वनी संभाषण असणार आहे. याआधी फेब्रुवारीत झालेल्या त्यांच्या संभाषणात दोन्ही नेत्यांनी युध्दविरामाबद्दल उच्चस्तरीय चर्चा करण्याचं मान्य केलं होतं.

**<><><><><>**

माजी केंद्रीय मंत्री देबेंद्र प्रधान यांचं आज नवी दिल्लीत निधन झालं. ते ८४ वर्षांचे होते. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे ते वडील होते. देबेंद्र प्रधान यांनी माजी प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात केंद्रीय दळणवळण तसंच कृषी मंत्री म्हणून काम केलं होतं. देबेंद्र प्रधान यांनी ओदिशातल्या भारतीय जनता पार्टीचं अध्यक्षपदही भूषवले होते.

**//<><><><><>//**